## निवडक



### महिला विश्वचषकाच्या तयारीसाठी ऑस्ट्रेलियाचा भारत दौरा

**नवी दिल्ली, दि. ३१ :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ऑस्ट्रेलिया महिला संघाच्या भारत दौऱ्याची घोषणा केली आहे, ज्यामध्ये १४, १७ आणि २० सप्टेंबर रोजी तीन एकदिवसीय सामने खेळले जातील. हे तीन सामने चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळले जातील.
२६ सप्टेंबरपासून घरच्या मैदानावर होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकात खेळणाऱ्या भारतीय महिला संघासाठी ते महत्त्वपूर्ण तयारी म्हणून काम करतील , ज्याचा अंतिम सामना २ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या महिन्याच्या सुरुवातीला, भारतीय महिला संघाने श्रीलंकेत यजमान, भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला संघादरम्यान झालेल्या एकदिवसीय तिरंगी मालिकेत विजय मिळवला. त्यानंतर, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ इंग्लंडला जाणार आहे, जिथे ते २८ जूनपासून घरच्या संघाविरुद्ध पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने खेळतील.
इंग्लंड दौरा २२ जुलैपर्यंत सुरू राहील, त्यानंतर एकदिवसीय विश्वचषक सुरू होण्यास फक्त दोन महिने शिल्लक राहतील. इंग्लंड दौऱ्यासाठी संघाची घोषणा १५ मे रोजी करण्यात आली होती, ज्यामध्ये शेफाली वर्मा अद्याप एकदिवसीय संघातून बाहेर पडली आहे, परंतु ती टी-२० संघात पुनरागमन करत आहे.
उल्लेखनीय म्हणजे, भारतीय महिला संघ गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियामध्ये ऑस्ट्रेलियन महिलांविरुद्ध शेवटचा एकदिवसीय सामना खेळला होता, जिथे भारताला एकदिवसीय मालिका ०-३ अशी गमवावी लागली होती. आगामी दौऱ्यात चांगली कामगिरी केल्यास त्यांना विश्वचषकापूर्वी खूप आत्मविश्वास मिळेल.

# मुंबईची क्वालिफायर २ मध्ये धडक

## गुजरातचा एलिमिनेटरमध्ये २० रन्सने धुव्वा | २ पराभवांचा हिशोब क्लिअर

**मुंबई, दि. ३१ :**

मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्या याच्या नेतृत्वात आयपीएल २०२५ च्या क्वालिफायर २ मध्ये धडक दिली आहे. मुंबईने रंगतदार झालेल्या एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्सचा धुव्वा उडवला आहे. मुंबईने गुजरातला विजयासाठी २२९ रन्सचं टार्गेट दिले होते. मात्र मुंबईच्या गोलंदाजांसमोर गुजरातला २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून २०८ रन्सच करता आल्या. साई सुदर्शन याने जोरदार झुंज देत गुजरातच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या होत्या. मात्र मुंबईने निर्णायक क्षणी सामन्यात कमबॅक केले. पलटणने मोक्याच्या क्षणी वॉशिंग्टन सुंदर आणि साई सुदर्शन या दोघांना बाद केले. त्यानंतर मुंबईच्या गोलंदाजांनी गुजरातच्या फलंदाजांना योग्य वेळेस आऊट केले आणि विजयापासून पद्धतशीर दूर ठेवले.

मुंबईने २२९ धावांचा पाठलाग करणाऱ्या गुजरातला पहिल्याच ओव्हरमध्ये झटका दिला. ट्रेंट बोल्टने कॅप्टन शुबमन गिल याला १ रनवर एलबीडब्ल्यू आऊट केले. त्यानंतर साई सुदर्शन आणि कुसल मेंडीस जोडी चांगलीच जमली होती. मात्र कुसल मेंडीस याने पायावर धोंडा मारला. कुसल हिट विकेट झाला आणि मुंबईला गिफ्टमध्ये आपली विकेट दिली. कुसलने २० रन्स केल्या. कुसल आणि साईने दुसऱ्या



विकेटसाठी ६४ रन्सची पार्टनरशीप केली.

त्यानंतर साई आणि वॉशिंग्टन या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी निर्णायक भागीदारी केली. ही जोडी मुंबईवर पूर्णपणे वरचढ ठरली. हे दोघे जोपर्यंत मैदानात होते तोवर गुजरातचा विजय निश्चित समजला जात होता. दोघांनी मुंबईच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली. त्यामुळे मुंबईच्या हातातून सामना गेला होता. मात्र मुंबईने हार मानली नाही. मुंबई विकेटच्या शोधात होती. मुंबईच्या विकेटची प्रतिक्षा जसप्रीत बुमराह याने संपवली. बुमराहने अचूक यॉर्कर टाकत वॉशिंग्टनला क्लिन बोल्ड केले आणि सेट जोडी फोडली. वॉशिंग्टन आणि साईने तिसऱ्या विकेटसाठी ८४ रन्सची पार्टनरशीप केली. वॉशिंग्टन २४ बॉलमध्ये ४८ रन्स करुन आऊट झाला.

त्यानंतर मुंबईला मोठी विकेट मिळाली. रिचर्ड ग्लीसन याने साई सुदर्शन याला बोल्ड केलं आणि मुंबईला मोठी विकेट मिळवून दिली. साईने ४९ बॉलमध्ये ८० रन्स केल्या. साईच्या विकेटसह मुंबईने विजयाचा दावा ठोकला. मात्र गुजरातही सामन्यात कायम होती. मात्र मुंबईने ठराविक अंतराने गुजरातला आणखी २ झटके दिले आणि विजयी धावांपर्यंत पोहचण्यापासून रोखले. टेंट्र बोल्टने शेरफेन रुदरफोर्ड याला २४ रन्सवर तिलक वर्मा याच्या हाती कॅच आऊट केले. अश्विनी कुमार याने शाहरुख खान याला १३ रन्सवर सूर्यकुमार यादवच्या हाती कॅच आऊट केलं. तर राहुल तेवतिया १६ रन्सवर नॉट आऊट परतला. मुंबईने यासह क्वालिफायर २ मध्ये प्रवेश निश्चित केला आणि गुजरातच्या २ पराभवाचा हिशोब चुकता केला. गुजरातने मुंबईला या हंगामातील साखळी फेरीतील दोन्ही सामन्यांमध्ये पराभूत केले होते.

मुंबईकडून ट्रेंट बोल्ट याने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. तर जसप्रीत बुमराह, रिचर्ड ग्लीसन, मिचेल सँटनर आणि अश्वनी कुमार या चौघांनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली. आता मुंबईचा १ जून रोजी क्वालिफायर २ मध्ये पंजाब विरुद्ध सामना होणार आहे. मुंबई-पंजाब यांच्यातील विजेता संघ अंतिम फेरीत आरसीबी विरुद्ध भिडणार आहे.

# आयपीएल २०२५ च्या ट्रॉफीवर कोण नाव कोरणार ?

## एबी डिव्हिलियर्सची प्रतिक्रिया

**मुंबई, दि. ३१ :**

आयपीएल २०२५च्या अंतिम फेरीमध्ये आरसीबीने यंदा धडक मारली आहे. क्वालिफायर १ मध्ये पंजाब किंग्सचा आठ विकेट्सने पराभव केला. नऊ वर्षांनंतर आरसीबीने फायनलमध्ये प्रवेशे केला. याआधी २०१६ मध्ये फायनल गाठली होती पण त्यांना ट्रॉफीवर नाव कोरता आलं नाही. यंदा पहिल्यांदा विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरण्याची नामी संधी आरसीबीकडे आहे. तर शुक्रवारी मुंबईने गुजरात टायटन्सचा पराभव करत क्वालिफायर २ मध्ये एन्ट्री मारली आहे. या दोन्ही सामन्यानंतर एबी डिव्हिलियर्सची प्रतिक्रिया समोर आली आहे.



मुंबई इंडियन्सने काल रात्री दमदार विजय मिळवला आणि क्वालिफायर २ सामनाही तगडा असणार आहे. मी फायनल पाहण्यासाठी खूप उत्सुक आहे आणि आशा आहे की हे वर्ष आरसीबीचे असेल. आरसीबी फायनलमध्ये गेल्याने मी खूप आनंदी असल्याचं एबी डिव्हिलियर्सने म्हटलं आहे. एबीने 'प्रोजेक्ट मुंबई' उपक्रमात भाग घेतला आणि मरीन लाइन्समधील इस्लाम जिमखान्यात सराव सत्रादरम्यान मुंबईच्या व्हीलचेअर क्रिकेट संघाला भेट देत तिथे खेळलाही.

आरसीबीने आयपीएल २०२५ च्या अंतिम फेरीत प्रवेश करून इतिहास रचला आहे. मुंबई येथे झालेल्या क्वालिफायर १ च्या सामन्यात त्यांनी पंजाब किंग्सचा आठ गडी राखून पराभव केला. या विजयासह आरसीबीने नऊ वर्षांनंतर आयपीएलच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. यापूर्वी २०१६ मध्ये त्यांनी अंतिम फेरी गाठली होती, त्याच वर्षी ते लीग स्टेजमध्ये पहिल्या दोन संघांमध्ये होते.

# मुंबई इंडियन्स क्वालिफायर जिंकली ; तर फायनलही खिशात घालणार ?

**अहमदाबाद, दि. ३१ :**

मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सवर विजय साकारला आणि त्यांनी थेट क्वालिफायर २ सामन्यात दिमाखात प्रवेश केला. पण आता त्यांना जर फायनलमध्ये पोहोचायचे असेल तर त्यांना पंजाब किंग्स या संघाशी दोन हात करावे लागतील. पण जर मुंबईच्या संघाने क्वालिफायरचा सामना जिंकला तर ते फायनलही जिंकू शकतात, असे समीकरण आता समोर आले आहे.

मुंबई इंडियन्सने आतापर्यंत पाच आयपीएलची जेतेपदं जिंकली आहेत. पण क्वालिफायर २ या सामन्याच मात्र ते आतापर्यंत चारवेळा पोहोचले आहेत. क्वालिफायर २ हा सामना करो या मरो असाच असतो. कारण हा सामना जो जिंकतो तो थेट फायनलमध्ये पोहोचतो, तर जो संघ पराभूत होणार त्यांचे आव्हान संपुष्टात येते. त्यामुळे ही आयपीएलची सेमी फायनल समजली जाते.

मुंबईच्या संघाने २०१३ साली झालेला क्वालिफायर २ चा सामना जिंकला होता. त्यानंतर मुंबईचा संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. अंतिम फेरीत मुंबईचा सामना चेन्नई सुपर किंग्सबरोबर झाला होता. या अंतिम सामन्यात मुंबईने चेन्नईवर विजय साकारत ट्रॉफी जिंकली होती. त्यानंतर मुंबईचा संघ २०१७ साली जेव्हा क्वालिफायर २ सामन्यात पोहोचला होता, त्यावेळीही मुंबईने हा सामना जिंकला होता. त्यानंतर मुंबईचा अंतिम फेरीतील सामना रायझिंग पुणे सुपरजायंट्सशी झाला. या अंतिम सामन्यात मुंबईच्या संघाने बाजी मारली होती आणि त्यांनी आयपीएलचे जेतेपद जिंकले होते. त्यामुळे जेव्हा जेव्हा मुंबईचा संघ हा क्वालिफायर २ हा सामना जिंकला आहे, त्या त्यावेळी मुंबईच्या संघाने आयपीएलचे जेतेपदही जिंकले आहे.

यावेळी पुन्हा एकदा मुंबईचा संघ क्वालिफायर २ सामन्यात दाखल झाला आहे. त्यामुळे या सामन्यात जर त्यांनी विजय साकारला तर ते यावेळीही आयपीएलची ट्रॉफी जिंकू शकतात, असे आता समोर येत आहे.

# 'आम्ही तिथेच सामना गमावला होता'

## मुंबई इंडियन्सच्या विजयावर शुभमन गिल स्पष्टच बोलला

**मुंबई, दि. ३१ :**

आयपीएल २०२५ चा विजेता आता अवघ्या दोन सामन्यानंतर मिळणार आहे. अंतिम चारमधील गुजरात टायटन्सचा प्रवास आता संपला आहे. शुक्रवारी झालेल्या एलिमिनेटनर सामन्यामध्ये मुंबईने गुजरातचा पराभव केला. या सामन्यामध्ये मुंबईने प्रथम फलंदाजी करतानास २० ओव्हरमध्ये २२८-५ धावा केल्या होत्या. मात्र या धावांचा पाठलाग करताना गुजरातचा संघ २० ओव्हरमध्ये २०८-६ धावा करून शकला. गुजरातने आपली सगळी ताकद लावली होती पण त्यांच्या हाती निराशा आली. एलिमिनेटरमध्ये झालेल्या पराभवामुळे ते आता बाहेर पडले असून मुंबई आणि पंजाबमध्ये विजेता फायनलमध्ये आरसीबीसोबत भिडणार आहे. अंतिम चारपर्यंत येण्यासाठी



घेतलेली मेहनत वायाला गेली. कोणत्याही कर्णधाराला ही पराभव पचवणे काही सोपे नाही.

पॉवरप्लेमध्ये लवकर विकेट्स गमावल्यास मोठे लक्ष्य गाठणे सोपे नसते. जेव्हा लवकर विकेट्स पडल्या, तेव्हा साई सुदर्शन आणि वॉशिंग्टन सुंदर यांना एकच गोष्ट सांगितली गेली की लक्ष्याचा पाठलाग करायचा आहे. पण तीन ते चार ओव्हर आमच्या बाजूने झाल्या नाहीत, पण तरीही टीमने चांगला खेळ दाखवला, असं शुबमन गिल म्हणाला.

गुजरात टायटन्सच्या फलंदाजी दरम्यान साई सुदर्शन आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी चांगली भागीदारी केली, परंतु ते संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. गुजरात टायटन्सच्या गोलंदाजांनी मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांना रोखण्यात अपयश आले, ज्यामुळेमुंबई इंडियन्सने मोठा स्कोर उभा केला. गुजरात टायटन्सच्या क्षेत्ररक्षकांनीही काही झेल सोडले, ज्याचा फटका टीमला बसला. गुजरात टायटन्सच्या फलंदाजांनी सुरुवातीलाच विकेट्स गमावल्यामुळे मधल्या फळीवर दबाव आला. गुजरात टायटन्सच्या खेळाडूंनी शेवटपर्यंत हार मानली नाही आणि संघर्ष करत राहिले, पण त्यांना विजय मिळवता आला नाही.

दरम्यान, मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंनी या विजयाचा आनंद साजरा केला आणि अंतिम फेरीसाठी तयारी सुरू केली आहे. पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना रोमांचक होण्याची शक्यता आहे. या सामन्यातील विजेता संघ अंतिम फेरीत आरसीबीशी भिडेल, त्यामुळे अंतिम सामना चुरशीचा होईल, अशी अपेक्षा आहे.

# पुढच्या महिन्यापासून क्रिकेटचे नियम बदलणार

## आयसीसीचा मोठा निर्णय | १७ जूनपासून लागू होणार नियम

**नवी दिल्ली, दि. ३१ :**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) लवकरच प्लेइंग-११ च्या नियमांमध्ये काही बदल करणार आहे. आयसीसीच्या वतीने आपल्या सदस्यांना त्यासंदर्भातील माहिती दिली आहे.

सुधारित प्लेइंग-कंडीशन जूनपासून कसोटी सामन्यांमध्ये आणि जुलैपासून पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये लागू होतील. विशेष करून प्लेइंग-११ च्या अटींमध्ये सर्वात मोठा बदल एकदिवसीय आंतररा÷ष्ट्रीय (ओडीआय) मध्ये होणार आहे. चला तर जाणून घेऊया सर्व नियमांविषयी आणि कसा होणार त्याचा क्रिकेटमध्ये वापर..!

सध्या, एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात दोन्ही टोकांकडून दोन नवीन चेंडू वापरले जातात. परंतु आता नवीन नियमानुसार, डावातील पहिल्या ३४ षटकांसाठी दोन्ही चेंडू वापरले जातील. त्यानंतर ३५ व्या षटकापासून डावाच्या शेवटपर्यंत दोन्ही टोकांकडून फक्त एकच चेंडू वापरला जाईल.

३४ षटक पूर्ण झाल्यानंतर आणि ३५ व्या षटक सुरू होण्यापूर्वी, क्षेत्ररक्षण करणारा संघ



त्या दोन चेंडूंपैकी एक निवडेल. जर सामना पावसामुळे किंवा इतर कारणांमुळे प्रभावित झाला आणि २५ षटकांचा किंवा त्यापेक्षा कमी असेल, तर फक्त एकच चेंडू वापरला जाईल. ३४ षटकांनंतर वापरला जाणार नाही तो चेंडू बॅकअप म्हणून ठेवला जाईल.

आता प्रत्येक संघाला सामन्यापूर्वी ५ बॅकअप खेळाडूंची नावे द्यावी लागतील. यामध्ये १ फलंदाज, १ यष्टिरक्षक, १ वेगवान गोलंदाज, १ फिरकी गोलंदाज, १ अष्टपैलू खेळाडू यांचा समावेश असेल. जर बदललेला खेळाडूही जखमी झाला तर सामनाधिकारी नवीन पर्याय निवडू शकतात.

सीमारेषेवरील झेल आणि डीआरएस (निर्णय पुनरावलोकन प्रणाली) च्या नियमांमध्ये थोडासा बदल होईल, परंतु त्याची माहिती नंतर दिली जाईल. सुरुवातीला असे समजले जात होते की प्रस्तावित बदल एका कार्यगटाकडे पाठवले जातील, परंतु आता आयसीसीच्या मुख्य कार्यकारी समितीने सुधारणांना मान्यता दिल्याचे ज्ञात आहे.

लवकरच एक कार्यगट तयार केला जाईल, जो १९ वर्षांखालील विश्वचषक टी-२०, ५० षटकांच्या किंवा हायब्रिड स्वरूपात खेळवायचा की नाही हे ठरवेल. १७-२० जुलै रोजी सिंगापूरमध्ये होणाऱ्या वार्षिक परिषदेपूर्वी कार्यगट तयार होण्याची अपेक्षा आहे.

कधीपासून लागू होणार नवीन नियम ?

जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) २०२३-२५ चा अंतिम सामना जुन्या नियमांनुसार खेळवण्यात येईल. हा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ११ जूनपासून लॉर्ड्स येथे होणार आहे.

कसोटी क्रिकेटमधील नवीन नियम जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या पुढील चक्रापासून (२०२५-२७) लागू होतील. खरं तर, नवीन नियम १७ जूनपासून गॉलमध्ये होणाऱ्या श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्यापासून लागू होणार आहेत. २ जुलैपासून एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात नवीन नियम लागू होतील. तुम्हाला सांगतो की एकदिवसीय मालिकेचा पहिला सामना २ जुलै रोजी श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यात होणार आहे. त्याच वेळी, १० जुलैपासून नवीन नियमांसह टी-२० सामना खेळला जाईल. श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील टी-२० मालिकेचा पहिला सामना १० जुलै रोजी होणार आहे.

# रोहित शर्मा आयपीएलमध्ये ३०० षटकार मारणारा पहिला भारतीय

## ७००० धावा करणारा दुसरा खेळाडू ठरला

**मुल्लानपूर, दि. ३१ :**

रोहित शर्माने आयपीएलच्या इतिहासात ३०० षटकार मारणारा पहिला भारतीय खेळाडू बनून इतिहास रचला. गुरुवारी, ३० मे रोजी पीसीए येथे मुंबई इंडियन्स (एमआय) आणि गुजरात टायटन्स (जीटी) यांच्यात झालेल्या आयपीएल २०२५ च्या एलिमिनेटर सामन्यात त्याने हा ऐतिहासिक टप्पा गाठला.

वेस्ट इंडिजचा दिग्गज सलामीवीर ख्रिस गेल (३५७ षटकारांसह) नंतर हा विक्रम करणारा रोहित शर्मा हा दुसराच क्रिकेटपटू ठरला. रोहितने आयपीएलमध्ये २६७ सामन्यांमध्ये २६१ डावांमध्ये ३०० षटकार मारले.

विराट कोहलीनंतर रोहित शर्मा आयपीएलच्या इतिहासात ७००० धावा पूर्ण करणारा एकमेव दुसरा फलंदाज ठरला आहे. कोहलीने २६६ सामन्यांमध्ये २५८ डावांमध्ये ८६१८ धावा केल्या आहेत. या सामन्यापूर्वी रोहित शर्माने २६५ डावांमध्ये २९.६० च्या सरासरीने १३१.८३



च्या सरासरीने ६९५३ धावा केल्या होत्या. त्याच्या नावावर आयपीएलमध्ये ४६ अर्धशतके आणि दोन शतके आहेत.मनोरंजक गोष्ट म्हणजे, रोहित, ज्याला याआधी दोनदा गेराल्ड कोएत्झी आणि कुसल मेंडिसने बाद केले होते, त्याने एकाच चेंडूवर दोन्ही टप्पे गाठले. त्याने ३९ धावांवर फलंदाजी करताना रशीद खानविरुद्ध ३०० वा षटकार मारला आणि ४३ वा धावांचा टप्पा ओलांडून ७००० धावा पूर्ण केल्या.

रोहित शर्माच्या डीप मिड-विकेटवर षटकार मारल्याने रशीद खान आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू बनला. त्याने फक्त २७ चेंडूत ४७ वे अर्धशतक पूर्ण केले. आयपीएल २०२५ मध्ये आतापर्यंत रोहितने मिश्र कामगिरी केली आहे. त्याने १३ डावांमध्ये २७.४१ च्या सरासरीने ३२९ धावा केल्या आहेत, त्याचा स्ट्राईक रेट १४७.५३ आहे. त्याने स्पर्धेत तीन अर्धशतके केली आहेत, ज्याचा सर्वोत्तम स्कोअर ७६* आहे.

**आयपीएलच्या एका हंगामात एका खेळाडूने दिलेले सर्वाधिक षटकार**

रशीद खान - २०२५ मध्ये ३२
मोहम्मद सिराज - २०२२ मध्ये ३१
युजवेंद्र चहल - २०२४ मध्ये ३०
वानिंदू हसरंगा - २०२२ मध्ये ३०

**आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक धावा**

विराट कोहली - ८६१८
रोहित शर्मा - ७०००
शिखर धवन - ६७६९

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २६९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 269 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .